

विनम्रता
आणि अहंकार
हे एकत्र
कधीच राहू
शकत नाहीत.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २४ जून २०२५ | अंक १८७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# ऐकावं ते नवलंच! बीडमध्ये चक्क पाझर तलाव गेला चोरीला

गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा गुन्हेगारी घटनांमुळे सतत चर्चेत आहे. आताही बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दैठणा गावात चक्क पाझर तलाव चोरीला गेल्याची घटना घडली आहे. जी जमीन शासनाने तलावासाठी संपादित केली होती, त्या जागेवर तलाव नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना संपादनाचे पैसे मिळालेले नाही. त्यामुळे बबन झांबरे यांच्यासह ग्रामस्थांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. समोर आलेल्या माहितीनुसार,






आष्टी तालुक्यातील दैठणा परिसरातील गात 4 मधील पाझर तलाव कागदपत्रावर आहे

मात्र प्रत्यक्षात तलावच अस्तित्वात नाही. गेली 20 वर्षांपासून बबन झांबरे हे तलावाचा पाठपुरावा करत आहेत, तलाव शोधण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र आद्याप त्यांना तलाव सापडलेला नाही. त्यामुळे तलाव ज्यांनी चोरी केला आहे त्या आधिकाऱ्यांवर आणि संबंधित व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी मागणी करत बबन झांबरे व ग्रामस्थांनी आष्टी तहसील कार्यालयसमोर आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे. याबाबत बोलताना बबन झांबरे यांनी म्हटले की, “माझी जी जमीन तलावासाठी संपादित करण्यात आली आहे तिथे तलाव नाही. मात्र जिथे तलाव बांधलेला आहे तिथली जमीन संपादित झालेली नाही. त्यामुळे आम्हाला त्रासाचा सामना करावा लागत आहे. गावातील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्ती प्रशासन हाताशी धरुण आमच्यावरच खोटे गुन्हे दाखल करतात. जो पर्यंत चौकशी होऊन संबधीतांवर कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण माघे घेणार नाही. न्याय नाही मिळाला तर आत्महदन करु.” याबाबत बोलताना सरपंच संभाजी झांबरे यांनी म्हटले की, ‘मौजे दैठणा गात अ 4 हा तलाव 2007 पासून तलाव चोरीला गेला

# परळीत चोर सोडून संन्याशाला फाशी

महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये गुटखाबंदीचा आदेश काढलेला असतानाही परळी शहरात खुलेआम गुटखा विक्री होत आहे तर बीडचे अन्न भेसळ अधिकारी तर परळी कडे फिरकत नसल्याची चर्चा आहे तर दुसरीकडे परळी शहर पोलिसांनी गुटखा पकडला मात्र आम्ही मोठी कारवाई केल्याचं वरिष्ठांना भासविण्यासाठी रेल्वे स्टेशन परिसरातील संभाजीनगर हद्दीमधील किरकोळ पानपटटी धारकावर कारवाई करून मुख्य गुटखा माफिया




कडून चिरीमिरी घेऊन सोडल्याची चर्चा परळी शहरात पसरली आहे संबंधित गुटखा माफीयाहा अंदाजे पाच ते सात तास बसून ठेवले होते सदरील माफिया परळी शहर पोलिसांच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद आहे मुख्य गुटखा माफिया सोडून दिल्ली चर्चा परळी झाल्यामुळे सदरील प्रकरण दडपवण्यासाठी पानपटी धारकावर थातुरमातुर कारवाई करण्यात आली आहे. याकडे बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी व जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक संबंधित चिरीमिरी घेणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी परळीकरांची मागणी आहे या मागील खरे गौडबंगाल काय अशी ही चर्चा परळी मध्ये सुरू आहे.

# संस्कार इंग्लिश हायस्कूल मध्ये योग दिन साजरा




बीड शहरातील प्रसिद्ध संस्कार इंग्लिश हायस्कूल येथे २१ जून रोजी योग दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी विद्यालयात डॉक्टर पांगरीकर मॅडम यांना बोलावले होते. पांगरीकर मॅडम यांनी योगासनाचे प्रात्यक्षिक दाखवून योगासनांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यालयाच्या प्राचार्या सुजा मॅडम उपप्राचार्य जॉन सर इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गौरी कुलकर्णी यांनी केले. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सतीश गिरी सर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

# लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत योगदिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे



लिंबागणेश:- ( दि.२३) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.२१ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले.मानसिक आरोग्य त्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्य देखील महत्वाचे असल्याची शिकवण दिली. शाळेच्या निसर्गरम्य प्रांगणात व प्रसन्न वातावरणात इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ताडासन, वज्रासन, भुजंगासन ,पश्चिमोत्तानासन,त्रिकोणासन, पवनमुक्तासन, सुर्य नमस्कार आदी योगासने करण्यात आली.विद्यार्थ्यांना अनुलोम -विलोम, कपाल भाती,भ्रामरी,भस्त्रीका,नाडी शोधन, प्राणायाम आदींची माहिती देण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक आगम एस.बी.,चौरे बी.बी.सहशिक्षिका श्रीमती माधुरी कुलकर्णी,आदी शिक्षकवृंद उपस्थित होते. योग प्रशिक्षण व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अमर पुरी यांनी केले.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात योग दिन साजरा

गुरुनानक प्राथमिक विद्यालयात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.ऐतिहासिक योग संगम कार्यक्रमांतर्गत साजरा करण्यात आलेल्या आणि धेसर ऋों जपश एरींह जपश कशरश्रींह(एक पृथ्वी,एक आरोग्य ,यासाठी योग) ही थीम असलेला हा उपक्रम सकाळी ६.३० ते ७.४५ दरम्यान पार पडला.विशेष म्हणजे यात शाळेचे विद्यार्थी तसेच त्यांचे पालक देखील सहभागी झाले. या अत्यावश्यक आणि उत्तम कामाची पावती म्हणून आयुष मंत्रालयाने सुंदर इ प्रमाणपत्र देऊन शाळेचा गौरव केला आणि उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले .श्री गदळे आर. ए.याची



पोर्टल वर नोंदणी केली तसेच संपूर्ण करत संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा आखून देत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. प्रोटोकॉल प्रमाणे विविध आसन व प्राणायाम यांची माहिती देत ते अत्यंत उत्साहात सर्वांकडून प्रत्यक्ष करून घेण्याचे श्रेय शाळेच्या योग शिक्षिका श्रीमती हंगे एस. आर यांना जाते. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार स्टाफमेंबर श्रीमती पव्हणे पी. एम. श्रीमती डोंगरे यू. एम. मुंडे एस. वी. ठोकरे एम. वी.तांदळे ए. ए. यांनी प्रयत्नपूर्वक उपक्रम यशस्वी केला. त्यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली . यानंतर शरीर व मनस्वास्थ्यासाठी वर्षभर घरी तसेच दर शनिवारी शाळेत योगाभ्यास करण्याचा संकल्प शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी केला.



बीड तालुक्यातील रामगडावरून पंढरपूर कडे आज पालखी मार्गस्थ झाली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम व राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी महंत योगीराज महाराजांचा सत्कार करून आशीर्वाद घेतले, यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशीं सह आदी



बीड: आदिशक्ती श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळा बीड शहरात आगमन प्रसंगी शिवसेना व धांडे परिवाराच्या वतीने शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी कुटुंबीयांसमवेत पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले यावेळी शिवसेना पदाधिकाऱ्यांसह बीड जिल्ह्यातील भावी फक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी बँकेकडून होणाऱ्या अडवणुकी विरोधात शिवसेनेने घेतली बँकेची शाळा

## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली बँकेची कान उघडणी

बीड : (प्रतिनिधी) सध्या सुरु असलेल्या खरीप हंगामात शेतकऱ्यांस आर्थिक अडचण निर्माण होत आहे. एक रुपयात पीक विमा ही योजना शासनाने गुंडाळली. तर नवीन पीक विम्या साठी शेतकऱ्यांना बँकानी प्रचंड नियम व अटी लादल्या आहेत. बँके कडुन शेतकऱ्यांचे सिबिल तपासले जात आहे. या विरोधात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे व विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे यांच्या शेतकरी हिताच्या संकल्पने नुसार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भारतीय स्टेट बँकेच्या मुख्य शाखेत जाऊन अधिकाऱ्यांची शाळा घेऊन कानउघडणी केली.शिवसेना प्रदोत सुनिलजी प्रभू, प्रवक्त्या सुषमाताई अंधारे व संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव यांच्या आदेशानुसार आज शिवसैनीकांनी आपला मोर्चा बँके कडे वळवला. पीक कर्जासाठी आलेले अर्ज किती? मंजूर अर्ज किती? नामंजूर अर्ज किती? प्रलंबित अर्ज किती व प्रलंबाचे कारण काय? पीक कर्जाचे उद्धीष्ट किती? शेतकऱ्यांना सिबिलचे कारण सांगून किती शेतकऱ्यांचा अर्ज



नामंजूर केला? या सह असंख्य प्रश्न उपस्थित करून शिवसैनिकांनी बँक अधिकाऱ्यांची शाळा घेतली.यावेळी महिला जिल्हा संघटक मीरा ताई नवले, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवाले, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,कामगार सेना रवी वाघमारे,नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे,सतीशसिंह परदेशी, गणेश लोणकर, मच्छिंद्र काळे, सतीश मस्के, नंदकुमार घोगरे,शेख मुजमिल,रमेश नवले,विशाल तांबे व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

लोकआरंभ

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार २४ जून २०२५

https://lokaarambh.com



सं पा द की य

## अमेरिकेला पाकिस्तान प्रेमाचा भलताच उमाळा

सध्या अमेरिकेला पाकिस्तान प्रेमाचा भलताच उमाळा आहे. पाकिस्तान हा दहशतवाद पसरवणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश असून पाकिस्तान हीच दहशतवादाची फॅक्टरी आहे हे माहीत असूनही अमेरिका पाकिस्तानसाठी पायघड्या घालत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे तर पाकिस्तान प्रेम उतू चालले आहे. पाकिस्तान आपल्यासाठी खास देश आहे असे वक्तव्य त्यांनी नुकतेच केले आहे इतकेच नाही तर पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांनी यांना त्यांनी व्हाइट हाऊसमध्ये खास निमंत्रण देऊन त्यांच्यासोबत जेवण करत त्यांची सरबराई केली. अमेरिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी एखाद्या देशाच्या लष्करप्रमुखाला बोलावून त्याचा इतका मोठा सन्मान केला आहे. व्हाइट हाऊसमध्ये देशाचे प्रतिनिधी म्हणून देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान किंवा मंत्र्यांना निमंत्रित केले जाते. पाकिस्तानचे जनरल जिया - उल - हक, जनरल आयुब खान आणि जनरल परवेज मुशर्रफ यांना व्हाईट हाऊसने निमंत्रण दिले होते पण ते पाकिस्तानचे लष्करप्रमुख म्हणून नव्हे तर पाकिस्तानचे राष्ट्रपती म्हणून. व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या या भेटीत या दोघांत विविध विषयांवर चर्चा झाली. या चर्चेनंतर ट्रम्प यांनी भारत पाकिस्तान युद्ध आपणच थांबवल्याचा पुनरुच्चार केला. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिफ मुनीर यांनी भारत पाकिस्तान युद्ध थांबवल्याबद्दल ट्रम्प यांचे आभार मानून भारत पाकिस्तान युद्ध थांबल्याबद्दल ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी केली. हे सर्व अचंबित करणारे आहे. ज्या पाकिस्तानमुळे जगात दहशतवाद पसरत आहे त्याच पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला ट्रम्प बोलावतात त्यांच्यासोबत जेवण करतात. हा ट्रम्प यांचा दुटप्पीपणाच आहे. दहशतवादा विरोधातील लढाईत अमेरिकेचे धोरण किती संधीसाधू आणि स्वार्थी आहे हेच यातून दिसून येते. जनरल आसिफ मुनीर यांना भेटून ट्रम्प काय साध्य करू इच्छितात? ज्या पाकिस्तानला भारत क्रमांक एकचा शत्रू मानतो त्या पाकिस्तानला जवळ करण्यामागे ट्रम्प यांचा उद्देश काय ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर इराण इस्राईल यांच्यात सुरू असलेल्या युद्धात मिळेल. मागील आठवड्यात इस्राईलने इराणच्या आण्विक केंद्रावर हल्ला केला. याला प्रतिउत्तर म्हणून इराणनेही इस्राईलवर मोठा हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही देशांचे शेकडो नागरिक आणि सैनिक मरण पावले. हा संघर्ष अजूनही चालू आहे. या युद्धाआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते आयातुला खोमेनी यांना अमेरिकेशी आण्विक करार करण्याची गळ घातली मात्र खोमेनी यांनी ती स्पष्टपणे नाकारली. जर तुम्ही आमचे ऐकणार नसाल तर तुम्हाला त्याची किंमत मोजावी लागेल अशी धमकीच ट्रम्प यांनी तेंव्हा खोमेनी यांना दिली होती. त्यानंतर काही दिवसातच इस्राईलने इराणवर हल्ला केला याचाच अर्थ अमेरिकेच्या चिथावणीवरूनच इस्राईलने हा हल्ला केला. एकीकडे भारत पाकिस्तान युद्ध मी थांबवले असा डंका पिटत स्वतःला नोबेल पुरस्कार देण्याची मागणी करायची दुसरीकडे इस्राईल आणि इराणमध्ये युद्ध पेटवून द्यायचे. ट्रम्प यांचा हा कुटील डाव आता जगाच्या समोर आला आहे. इस्राईलने इराणवर हल्ला करूनही इराण आपले ऐकत नाही हे लक्षात आल्यावर ट्रम्प यांनी या युद्धात इस्रायलच्या बाजूने उतरण्याची धमकी दिली. या धमकीलाही इराणने जुमानले नाही त्यामुळे ट्रम्प तात्यांचा तिळपापड झाला आणि अखेर रविवारी अमेरिकेने या युद्धात प्रत्यक्ष भाग घेत इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर संपूर्ण जगभर खळबळ माजली असून अमेरिकेने या युद्धात प्रवेश करणे ही तिसऱ्या युद्धाची नांदी ठरू शकते असे जाणकार म्हणत आहेत. कारण या हल्ल्यानंतर इराणला अनेक देशांनी पाठिंबा दिला असून अमेरिकेचा निषेध केला आहे. या हल्ल्यानंतर इराणने रशियाशी संधान बांधले असून रशियाने इराणला पाठिंबा दिला आहे. अमेरिकेने पुन्हा इराणवर हल्ला केला तर रशिया इराणच्या बाजूने युद्धात उतरेल असे आश्वासन इराणला रशियाने दिले आहे. जर रशिया या युद्धात उतरलाच तर तिसऱ्या महायुद्धाला तोंड फुटेल.

# संस्थाचालक आणि मित्र परिवार यांच्या उपस्थितीत रंगला प्रा.डॉ.सुनील पंढरे यांचा सेवापूर्ती समारंभ

आष्टी (प्रतिनिधी) कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित गांधी महाविद्यालयातील क्रीडा संचालक प्रा. डॉ. सुनील पंढरे यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती सोहळा पार पडला. संस्थेचे पदाधिकारी मित्रपरिवार आणि आप्तस्वकीय यांच्या उपस्थितीमध्ये रंगतदार सोहळा पार पडला.अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष कांतीलालशेठ चाणोदिया, अमोलक ट्र स्टचे अध्यक्ष गोकुळशेठ मेहेर, अमोलक ट्रस्टचे उपाध्यक्ष बाबुशेठ भंडारी, योगेश भंडारी, कांतीलाल चाणोदिया, प्रधानमंत्री हेमंत पोखरणा, डा. उमेश गांधी, संचालक संजय मेहेर, प्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी, आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष इंजि. किशोर हंबर्डे, प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष वाल्मीकतात्या निकाळजे, अधिवक्ता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ बाबुराव अनारसे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटचे चेअरमन नामदेव राऊत, बीड येथील नवगण बीपीएड कॉलेजचे प्राचार्य डॉ. सूर्यकांत धोंडे, जामखेड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, राजेश मोरे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुभाष महाडिक, प्रशांत सहस्त्रबुद्धे, प्रशांत काटेकर, उपनगराध्यक्ष



शैलेश सहस्त्रबुद्धे, राजेश राऊत, मिलींद देशमुख, इंग्लिश माध्यम शाळेच्या प्राचार्या गुंदेचा, सुभाष बोदार्डे, शाम भोजने, प्रदीप सहस्त्रबुद्धे प्रशांत सहस्त्रबुद्धे, प्रा. डा. विनोद ढोबळे, डा. सचिन पटवा, विक्रम खेडकर, प्रा. डा. बाळासाहेब धोंडे, प्रा. डा. भास्कर चव्हाण, सुभाष रासकर, संपत गाडे पाटील, प्रा. डा. मुस्ताक पानसरे, गोरक्षनाथ सायकड या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला. यावेळी प्रस्ताविक प्राचार्य डा. ज. मो. भंडारी यांनी केले. यावेळी प्राचार्य डा. सुर्यकांत धोंडे, डा. प्रशांत सहस्त्रबुद्धे, पत्रकार उत्तम बोडखे, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, नामदेव राऊत, संजय मोरे, बाबुराव अनारसे, वाल्मिकतात्या निकाळजे, डा. उमेश गांधी, डा. सचिन पटवा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना पत्रकार उत्तम बोडखे यांनी सुनील पंढरे यांचेविषयी महाविद्यालयीन आठवणी जागवत त्यांना शुभेच्छा दिल्या. जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यावेळी बोलताना म्हणाले की, सुनील पंढरे यांच्यावर विद्यार्थी तसेच राष्ट्रवादी विचाराचे संस्कार झाले असून सेवानिवृत्तीनंतर त्यांनी या ध्येयाने प्रेरित होऊन समाजात काम करावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना विधीज्ञ बाबुराव अनारसे यांनी अमोलक संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या परवानगी वेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचेकडे स्व. रूपचंद गांधी आणि राष्ट्र ीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या विनंतीमुळे त्यांनी तात्काळ वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची संलग्नता मिळवून दिली. संस्थेच्या उज्ज्वल कामगिरी मध्ये प्रा. डॉ. सुनील पंढरे यांचा मोठा वाटा आहे. अमोलक संस्थेला वरिष्ठ महाविद्यालयाची परवानगी मिळवुन देण्यात रा. स्व. संघाच्या लोकांचे मोठे योगदान आहे. उर्वरीत काळात प्रा. पंढरे सरांनी रा. स्व. संघाचे पुर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करावे असे आवाहन केले. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष वाल्मीक निकाळजे यांनी सुनील पंढरे खेळाचे शिक्षक असून त्यांनी ऑलिंपियन अविनाश साबळे यांना शालेय जीवनामध्ये मार्गदर्शन केल्यामुळे यशस्वी झाले असल्याचे सांगितले. अमोलक संस्थेचे प्रधानमंत्री हेमंत पोखरणा यांनी संस्थेची प्रगती आणि पुढील योजनांची माहिती देताना संस्थेमध्ये यापुढ` आर्टीफिशियल इंटेलिजन्सवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून लवकरच अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. सामाजिक कार्यकर्ते बाबुशेठ भंडारी यांनी सुनील पंढरे यांची संस्थेला मार्गदर्शनाची आवश्यकता वाटेल त्यावेळेस त्यांनी यावे असे आवाहन केले. संचलन प्रा. डा. अनिल गर्जे यांनी तर आभार प्रशांत सहस्त्रबुद्धे यांनी मानले.

# अमृत योजना अंतर्गत बीड भुयारी गटार योजनेतील कामे बंद नागरीकांचे आरोग्य धोक्यात माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड

बीड. आम आदमी पार्टी च्या वतीने , केंद्र शासन पुरस्कृत ङ्गअमृत अभियानङ्ख अंतर्गत बीड शहरासाठी मंजूर करण्यात आलेली भुयारी गटार योजना ही अत्यंत महत्त्वाची नागरी सुविधा आहे. परंतु, सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी अर्धवट राहिल्यामुळे आणि काही प्रशासकीय कारणांमुळे कामे थांबविण्यात आली असल्याने बीड शहरातील नागरिक आज आरोग्याच्या गंभीर संकटाला सामोरे जात आहेत.अमृत अभियान अंतर्गत बीड भुयारी गटार योजना, ता. व जि. बीड योजना मंजूरी: शासन निर्णय क्र. अमृत-२०१७/प्र.क्र.६१०/ नवि-३३/दि. १५.०१.२०१८ ढोबळ अंदाजे किंमत:१६५.८० कोटी झालेला अंतिम खर्च: १७.६१ कोटी प्रत्यक्ष अडचणी व नागरिकांच्या समस्या: दिनांक २१.०९.२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीत कार्यकारी अभियंता श्री. के. बी. चिवरे यांनी स्पष्टपणे नमूद केले की, मलनिःसारण केंद्र (ST.P) व वेटवेलसाठी आवश्यक जागा न मिळाल्यामुळे निविदेतील कामे



बंद करण्यात आली. परिणामी, गटार व्यवस्था नसल्याने सांडपाणी रस्त्यावरून वाहते आहे, अनेक भागांत दुर्गंधी, डास, घाणीचा साठा निर्माण झाला आहे. परिणामी, शहरातील अनेक नागरिक आजारी पडत आहेत व सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे भारतीय राज्यघटना अनुच्छेद २१ नुसार प्रत्येक नागरिकाला ङ्गजीवित व स्वच्छ जीवनाचा अधिकारङ्ख आहे.अनुच्छेद ४७ नुसार राज्य शासनाचे कर्तव्य आहे की, नागरिकांचे आरोग्य सुधारावे आणि सार्वजनिक स्वच्छतेची हमी द्यावी. सार्वजनिक आरोग्य अधिनियम, नगरपालिका कायदे व महाराष्ट्र नागरी सेवा वितरण अधिनियम, २०१५ नुसार नगरपालिका व संबंधित प्राधिकरणांना आरोग्यविषयक सेवा पुरवणे बंधनकारक आहे. संबंधित अधिकाऱ्यांची प्रशासकीय जबाबदारी निश्चित करून, त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. मागण्या: योजनेतील कामे थांबवण्याचे कारण सार्वजनिक हिताविरोधात असल्याने तातडीने कामे पुन्हा सुरू करावीत. ड.ढ.झ व वेटवेलसाठी आवश्यक जागा तात्काळ उपलब्ध करून द्यावी.योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अडथळा आणणाऱ्या संबंधित यंत्रणा व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई करावी. सार्वजनिक आरोग्यासाठी तातडीच्या स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन व रोगप्रतीबंधक उपाययोजना राबवाव्यात. नियमित जनतेच्या देखरेखीत प्रगती अहवाल प्रसिद्ध करण्यात यावा.वरीलप्रमाणे आपण तातडीने आवश्यक उपाययोजना करून योजना पुन्हा सुरू केली नाही, तसेच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापनाचे ठोस पावले उचलली नाहीत, तर ही बाब नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन ठरले आहे तरी आपण दोषिवर कारवाई करा अन्यथा आम आदमी पार्टी नागरिकांना सोबत घेऊन अन्दोलण करनार यांची सर्वस्वी जबाबदार शासनाची असेल असे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत देण्यात आले यावेळी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी शहर अध्यक्ष सय्यद सादेक, रफिक पठाण,आजम खान, नागरगोजे, रामभाऊ शेरकर, कैलासचद पालीवाल इत्यादी कार्यकर्ते म ोठ्या संख्येने उपस्थित होते

# डिजिटल मिडिया परिषदेचा लवकरच राज्यव्यापी मेळावा होणार :एस.एम.देशमुख यांची कोल्हापुरात घोषणा

कोल्हापूर : महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचा विस्तार झाला असून उर्वरित जिल्ह्यात परिषद स्थापन होताच डिजिटल मिडियाचा एक राज्यव्यापी मेळावा पुणे किंवा संभाजीनगर येथे घेण्यात येणार असल्याची घोषणा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी काल येथे केली.. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची एक शाखा असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेचा कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पत्रकारांचा मेळावा, आणि ओळखपत्र वितरण समारंभ काल कोल्हापुरात संपन्न झाला.. मेळाव्यास दोन्ही जिल्ह्यातून पत्रकार मोठ्या प्रम ाणात उपस्थित होते.. सांगली आणि कोल्हापुरात डिजिटल मि डिया परिषदेचे काम जोरात सुरू आहे.. एस.एम.देशमुख यांनी या कामाचा आढावा घेतला.. तसेच उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन केले.. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच



पोर्टलचा उल्लेख नाही... ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले.. तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली.. डिजिटल मध्ये काम करणारया पत्रकारांना तांत्रिक गोष्टींची माहिती मिळावी यासाठी विभागवार कार्यशाळा घेण्याची परिषदेची योजना असल्याचे एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले.. यावेळी उपस्थित पत्रकारांनी काही मौलिक सूचना केल्या.. कार्यक्रमास विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, अधिस्विकृती समिती सदस्य जान्हवी पाटील, मुंबई विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्ष दीपक कैतके, पुणे विभागीय अध्यक्ष हरिष पाटणे, लातूर विभागीय अध्यक्ष विजय जोशी, कोल्हापूर विभागीय सचिव चंद्रकांत क्षीरसागर आदि उपस्थित होते.. जिल्हा अध्यक्ष गणपत शिंदे यांनी प्रास्ताविक केले, अभिजित पटवा यांनी सूत्र संचालन केले, अनिल धुतमाळ यांनी मतं मांडली.. यावेळी उपस्थित पत्रकारांना ओळखपत्रांचे वाटप एस.एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले..

# 29 -जून रोजी नांदेड येथे मराठा सेवा संघाची विभागीय बैठक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणी निवड समिती बैठक (मराठवाडा विभाग ) रविवार दि.२९-जून रोजी सकाळी १० वाजता हॉटेल अतिथी शिवाजी नगर नांदेड येथे निवड समिती प्रमुख संदिपान जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. मराठा सेवा संघ जिल्हा कार्यकारणी विभागीय कार्यकारणी तसेच राज्य कार्यकारणीवर काम करण्यास इच्छुकांनी आपले अर्ज निवड समितीकडे सादर करावेत.तसेच मराठा सेवा संघ प्रणित इतर ३३ कक्षामध्येही जिल्हा विभाग व राज्य कार्यकारणीमध्ये काम करण्यास इच्छुक असणाऱ्यांनी आपला फार्म भरून देता येईल. सदरील निवड समितीच्या बैठकीस नांदेड जिल्ह्यातील सर्व कक्षाचे आजी-माजी पदाधिकारी व समाज बांधव यांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडीतराव कदम जिल्हाध्यक्ष ॲड सतिषकुमार जाधव यांनी केले आहे.

# जेकोबीन कोकिळा (पायड कोकीळा )या विदेशी पक्षी ने सुमित राठोड यांच्या पाणपोईवर लावली हजेरी





प्रतिनिधी प्रांजली प्रविण काळबेंडे नागपूर दि.२२जुन २०२५ ला अत्यंत दुर्मिळ म्हणून औळख असलेल्या विदेशी पक्षी जेकोबीन कोकीळा ,पायड कोकिळा पक्षीने नागपूर मधील एस आर पी एफ कॅम्प हिंगणा मध्ये आढळले आहेत नागपूर राज्य राखीव पोलीस बलात पोलीस नाईक पदावर कार्यरत आसलेले सुमित राठोड हे आपले कर्तव्य बजाऊन पर्यावरण व पक्षी संरक्षण संवर्धन संगोपन करिता कार्य करिता आहेत संध्या उन्हाळा सगळीकडे असुन त्यांची चाहुल सर्वाना लागत आहे यात पशु पक्षी सह माणसाला सुध्दा यांचे चटके बसत आहेत सुमित राठोड यांनी या कडक उन्हात पक्षीला थंडगार पाणी व अन्न मिळावे या करिता तीन ठीकाणी अन्नधान्य व पाणपोई ची सोय केली आहे अन्नपोई क्रं १ रोप वाटीका या ठीकाणी चिऊताई चिरक भौरी सातभाई,दयाळ,भांगपाडीमैना,बुलबुल खारुताई राखी ववट्या अश्या विविध पक्षीनी हजेरी लावली आहे अन्नपोई क्रं.२ अंगणात सुध्या अन्नधान्य पाणपोई बसवली आहे या ठीकाणी चिऊताई चिरक भौरी सातभाई दयाळ कवडा असे बरेच पक्षी आलेत व अन्न पाणीचा आनंद घेतला आहे या शिवाय सुमित राठोड ज्या ठिकाणी कर्तव्याला आहेत विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर या परिसरात सुमित राठोड यांनी या ठिकाणी अन्नधान्य व पाणपोई बसवली आहे या ठिकाणी आजवर टिटवी कोतवाल भौरी कवडा राखी ववट्या भांगपाडी मैना बुलबुल साळुंकी तांबट छोटी चिमणी टकाचौर खारुताई सातभाई दयाळ शिक्रा कंठेरी होला चिरक हळद्या असे बरेच पक्षी आलेत व अन्न पाणी चा आनंद घेतला पण काल अचानक सुमित यांनी पाहीले की एक नविन पक्षी पाणपोई वर आलेत ते त्यांनी छान पाणी व अन्नाचा आनंद घेतला सुमित नी त्यांची फोटो काढली पण सुमित नी पक्षीला जवळुन पाहीले तर काय हा पक्षी अत्यंत दुर्मिळ म्हणून औळख असलेल्या विदेशी पक्षी जेकोबीन कोकीळा किंवा पायड कोकिळा म्हणून औळख असलेल्या पक्षी आफ्रीका व आशियातील काही भागात आढळतो तसेच काही काळ हा पक्षी स्थलांतरीत आहे भारतातील काही ठीकाणी या पक्षीला मान्सुन पावसाचे आगमन सुचक मानले जाते कारण यांचे आगमन मान्सून हंगामात होते भारतीय पौराणिक कथा व कवितेमध्ये चातक पक्षी संबंधित आहे जो फक्त पावसाचे पाणी पितो असे म्हणतात या अगोदर याच पाणपोईवर दुर्मिळ पक्षी निळा कस्तुर नी हजेरी लावली आहे आणि घरी ठेवलेल्या पाणपोई वर नारंगी या पक्षीने सुध्दा हजेरी लावली आहे सुमित राठोड हे स्वताला खुप भाग्यवान समजतात की पक्षी सेवा करताना असे दुर्मिळ पक्षी पाहायला मिळत आहे.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सातबारा सरसकट कोरा करा , जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात राष्ट्रीय समाज पक्षाचे धरणे आंदोलन

बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर साहेब. यांच्या आदेशानुसार व प्रदेशाध्यक्ष म हासचिव विभागीय अध्यक्ष यांच्या म ार्गदर्शनाखाली, बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्याने धरणे आंदोलन केले यावेळी त्यांच्या प्रमुख मागण्या केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अहवालानुसार शेतकऱ्यापेक्षा शेतम जुराचे उत्पन्न जास्तीचे आहे. शेती करणे नुकसानीचे बनले आहे. महाराष्ट्रामध्ये दिवसाला आठ शेतकऱ्यांची आत्महत्या होत आहे. अशा काळात राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी जाहीर केले होते की, आमचे सरकार आल्यास शेतकऱ्याचा सातबारा कोरा करणार आज हे धाडस दाखवण्याची वेळ आली आहे. मुख्यमंत्र्यांनी समिती स्थापन करत वेळ काढू पना करू नये. उद्योगपतींचे १६ लाख कोटी रुपयांची कर्ज राईट ऑफ करताना समिती स्थापन केली जात नाही. पण ३६ लाख शेतकऱ्यांना २५ हजार कोटींची कर्जमाफी करताना समितीचा अट्टाहास कशासाठी? मेट्रो ट्रेनसाठी १ लाख ८ हजार कोटीची तरतूद करू




शकता. शेतकऱ्यांचा विरोध असताना ८६ हजार कोटी शक्तिपीठ महामार्गासाठी दिले जातात. ३६ हजार कोटी लाडक्या बहिणीसाठी दिले जातात. मग शेतकऱ्यांना आश्वासन देऊन दुर्लक्षित केल्याने आत्महत्याच प्रमाण वाढला आहे. याला सर्वस्वी जबाबदार कोण? त्यामुळे लवकरात लवकर सरकारने सरसकट कर्जमाफी करावी. आम्ही शासनाला कळवीत आहे. शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमाफी करत सातबारा कोरा करावा या मागणी करिता राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने आम्ही बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात धरणे आंदोलन करत निवेदनाच्या माध्यमातून सदरची मागणी करीत आहे याची नोंद शासनाने घ्यावी अन्यथा तीव्र आंदोलन भविष्याच्या काळात छेडले जाईल. असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला यावेळी या आंदोलनाला जिल्ह्यातील सामाजिक राजकीय संघटनेने पाठिंबा दिला यावेळी उपस्थित सुशीला ताई मोराळे शेतकरी संघटना. सुभाष राऊत समता परिषद अध्यक्ष . विष्णू देवकते युवा मल्हार सेना अध्यक्ष.येडे सर आप जिल्हाध्यक्ष. बाळासाहेब मोरे भीम शक्ती शिवशक्ती अध्यक्ष. किसन तांगडे अध्यक्ष. भीमराव दळे सामाजिक कार्यकर्ते धनंजय गुंदेकर मार्केट कमिटी सदस्य अध्यक्ष. जेडी शहा सामाजिक कार्यकर्ते. महेंद्र मोरे संभाजी ब्रिगेड अध्यक्ष. किशोर सानप युवा नेते शिवराम शिरगिरे युवा नेते. बाळासाहेब लिंबागणेश सरपंच. कैलास निमर्ळ तांदळवाडी . कृष्णा पितळे माजी सरपंच मुळक. विनायक दादा वाणी. नवनाथ मुळे. बबन कोकाटे. कोकाटे सरपंच रोळसगाव. येळे साहेब. धापसे साहेब. मीनाताई देवकते सामाजिक कार्यकर्ते. गंडे मॅडम सामाजिक कार्यकर्ते . परमेश्वर कोळेकर वकील निलेश वाघमोडे गणेश कोळेकर सामाजिक कार्यकर्ते. माऊली शिरसाट सामाजिक कार्यकर्ते. सतीश काळे उपसरपंच परशीनाथ आगाम चेअरमन .आगाम विक्रम ग्रामपंचायत सदस्य. जालिंदर आगाम दादासाहेब मतकर हरिभाऊ निमर्ळ. अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष रासपा कपिल गाडेकर जिल्हाध्यक्ष रासपा विक्रम आप्पा सोनसळे लोकसभा अध्यक्ष बीड. भगवान माने कर्मचारी अध्यक्ष. काशीद परशुराम विद्यार्थी आघाडी बीड. शिवाजी चांगण युवा कार्यकर्ते बालाजी काळे युवक जिल्हाध्यक्ष बीड. बाळासाहेब सापनकर तालुका अध्यक्ष बीड माऊली मार्केड,तालुका अध्यक्ष बीड. भोंडवे रतन जिल्हा उपाध्यक्ष आसाराम महाराज म हानोर तालुका अध्यक्ष पाटोदा केदार सर तालुका अध्यक्ष शिरूर. सातपुते तालुकाध्यक्ष वडवणी. निवृत्ती खाटीक तालुका अध्यक्ष परळी. अंकुश गवळी पत्रकार. गोवर्धन गोरे माजी तालुका अध्यक्ष बीड संतोष एरंडे . सोलंकर आबा बोडके तालुका उपाध्यक्ष शिरूर. बापूराव श्रीराम अविनाश खांडेकर. आधी उपस्थित होते यावेळी या आंदोलनाला हजारो लोकांनी भेट दिली व आपल्या पाठिंबा दर्शविला , यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# एन.सी.सी.वार्षिक प्रशिक्षण शिबिराचा किनवट येथे शुभारंभ

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : किनवट येथील मातोश्री कमलाबाई ठमके विद्यालयात ५२ महाराष्ट्र एनसीसी बटालियन नांदेडच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ संपन्न झाला.शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व मार्गदर्शक कॅम्प कमांडंट कर्नल के.डी.रेड्डी होते.याप्रसंगी कॅम्प डेप्युटी कमांडंट कॅप्टन काजी एस.एस.व कॅम्प अडज्यूटन्ट कॅप्टन नीरज उपलंचार, लेफ्टनंट प्रदिप सातव, सेकंड ऑफिसर सोनल जैस्वाल, फर्स्ट ऑफिसर






डी.एस.कदम, सुभेदार मेजर घामश्याम सिंग यांच्यासह आर्मीचे इतर अधिकारी उपस्थित होते.या शिबिरात नांदेड, परभणी व हिंगोली या जिल्ह्यातील महाविद्यालयीन व माध्यमिक विद्यालयातील विविध शाळांचे छात्र सैनिक व पाच एनसीसी अधिकारी आणि सैन्य अधिकारी सहभागी झाले आहेत. प्रशिक्षणात ड्रिल, फायरिंग, शस्त्र कवायत, नकाशा अध्ययन, सैन्य प्रशिक्षण, अंबुश, पेट्रोलिंग, आपत्ती व्यवस्थापन व आत्मरक्षा सामाजिक सेवा आदी प्रशिक्षण दहा दिवसीय शिबिरात दिले जाणार आहे.यावेळी सुभेदार शिवाजी हरंगुळे, नायब सुभेदार राशीद खान, नायब सुभेदार राकेश कुमार, रंजीतसिंग, हवालदार रमेश रावेला, सुरेश गायकवाड, राहुल सोनकांबळे, जितेंद्र, नाईक ब्रिजेश, त्रिप्ती कुमारी व जीसीआय साक्षी कंधारे तसेच कार्यालयीन कर्मचारी रियाज अन्सारी, सचिन साबळे, काटकर बाबूजी, गिरी, पुरी, पडलवार, आलटे यासह ४५१ एनसीसी कॅडेटस सहभागी झाले आहेत.

# प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत किनवट पंचायत समिती येथे कार्यशाळा संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत किनवट पंचायत समि तीच्या सभागृहात एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेचे आयोजन नांदेड जिल्हा परिषदेच्या मा.मुख्य कार्यकारी अधिकारी म घना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यशाळेस प्रमुख उपस्थिती म्हणून मा.जेनित चंद्रा दोन्तुला (सहाय्यक जिल्हाधिकारी) मंजुषा कापसे (उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत) ज्ञानेश्वर टाकरस (गटविकास अधिकारी किनवट) प्रदीप नाईक (सहाय्यक प्रकल्प अधिकारी)





रामेश्वर मुंडे (तहसीलदार, किनवट) यांनी म ार्गदर्शन केले.कार्यशाळेमध्ये किनवट, माहुर, हिमायतनगर, भोकर, हदगाव, उमरी, धम ाबाद, मुखेड, मुदखेड या तालुक्यांतील तहसीलदार, गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी अभियानाच्या उद्दिष्टांवर सविस्तर प्रकाश टाकला.त्यांनी सर्व जनजाती कुटुंबांचे ऑनलाईन सर्वेक्षण तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले.याशिवाय पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी व आवश्यक प्रमाणपत्रे/दाखले त्वरित देण्याचे आदेशित केले. तसेच आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक संवेदनशीलतेने काम करण्याचे आवाहन अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले. सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांनी अभियानाची रूपरेषा व कार्यपद्धती स्पष्ट करत महत्त्वाच्या बाबीवर मार्गदर्शन केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी वसंत वाघमारे, कैलास गायकवाड, राजेश मॅकलवार यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेच्या माध्यमातून अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासन स्तरावर समन्वय व जागरूकतेचा पाया घालण्यात आला.

# लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत योगदिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे

लिंबागणेश:- ( दि.२३) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.२१ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले.मानसिक आरोग्य त्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्य देखील महत्वाचे असल्याची शिकवण दिली. शाळेच्या



निसर्गरम्य प्रांगणात व प्रसन्न वातावरणात इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ताडासन, वज्रासन, भुजंगासन,पश्चिमोत्तानासन, त्रिकोणासन,पवनमुक्तासन, सुर्य नम स्कार आदी योगासने करण्यात आली. विद्यार्थ्यांना अनुलोम -विलोम, कपाल भाती,भ्रामरी,भस्त्रीका,नाडी शोधन, प्राणायाम आदींची माहिती देण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक आगम एस.बी.,चौरे बी.बी.सहशिक्षिका श्रीम ती माधुरी कुलकर्णी,आदी शिक्षकवृंद उपस्थित होते. योग प्रशिक्षण व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अमर पुरी यांनी केले.

# आषाढी वारी-आज रामगड संस्थान दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

बीड प्रतिनिधी स्वल्प वाटे चला जाऊें वाचे गाऊ विठ्ठल तुम्ही आम्ही खेळमेळीं गदारोळी आनंदे आषाढी एकादशी म्हणजे वारकरी संप्रदाया साठी भक्तीची मोठी पर्वणी आहे. लाखो वारकरी पांडुरंगाच्या दर्शनासाठी हरिनामाचा गजर करत पंढरीकडे जातात. रामगडाच्या परंपरेनुसार श्री क्षेत्र रामगड ते श्रीक्षेत्र पंढरपूर श्री संत रामबाबा पालखी सोहळा पायी दिंडीचे महंत ह भ प स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शना खाली आज पंढरपूर कडे प्रस्थान झाले. आज सायंकाळी रामगड येथे महंत स्वामी योगीराज महाराज यांच्या हस्ते पूजा आरती करून दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान झाले. यावेळी विश्वस्त तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी सभापती सोमनाथ माने, विश्वस्त माजी सरपंच रामभाऊ बांड, कल्याणराव पवार यांच्या सह मान्यवर भाविक



भक्त बहुसंख्येने उपस्थित होते. अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात पालखी व दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. वारकरी संप्रदायाचे प्रेरणा आणि तीर्थस्थान पंढरपूर येथे आषाढी वारी करिता लाखो भाविक भक्त पंढरपुरात दाखल होतात. परंपरेनुसार श्रीक्षेत्र रामगड पंचक्रोशीतील शेकडो भाविक भक्त पायी दिंडीने पंढरीची वारी करतात. श्री संतराम बाबा यांच्या पालखी सह शेकडो वारकरी साधारण १३ दिवसांचा पायी प्रवास करत हरिनामाच्या गजरात ही दिंडी पंढरपुरात दाखल होते.

# १२ दिवसांनंतर युद्ध थांबले: इराण-इस्त्रायल यांच्यात शस्त्रसंधी, डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायल आणि इराण यांच्यात शस्त्रसंधीबाबत एकमत झाल्याचा दावा केला आहे. 12 दिवसांनंतर दोन्ही देश युद्ध थांबवण्यास तयार झाले आहे, असे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथवर म्हटले आहे. अमेरिकेने इराणच्या तीन अणू प्रकल्पांवर हल्ला केल्यानंतर इराण-इस्त्रायल संघर्ष तीव्र होण्याची शक्यता होती. ट्रम्प काय म्हणाले... अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, सर्वांचे अभिनंदन! इराण आणि इस्त्रायलमध्ये पूर्ण युद्धबंदी झाली आहे. युद्धबंदी सहा तासांच्या आत सुरू होईल. इराणला प्रथम त्याचे पालन करावे लागेल. इराणने युद्धबंदीचे पालन केल्यानंतर पुढील 12 तासांनंतर इस्त्रायल युद्धबंदीत सामील होईल. 24 तासांनंतर युद्ध औपचारिकपणे संपल्याचे मानले जाईल. मी इस्त्रायल आणि इराण या दोन्ही देशांचे, त्यांच्याकडे असलेली सहनशक्ती, धैर्य आणि बुद्धिमत्ता याबद्दल अभिनंदन करू इच्छितो.



13 जून रोजी इस्त्रायलने इराणच्या अणू प्रकल्पांवर हल्ले केले होते. गेल्या 12 दिवसांपासून दोन्ही देशांमधील संघर्ष सुरू आहे. या संघर्षात इस्त्रायलला अमेरिकेचाही पाठिंबा मिळाला. त्यानंतर अमेरिकेनेही या युद्धात उडी घेतली. अमेरिकन सैन्याने इराणच्या तीन अणुस्थळांवर हल्ला केला. अमेरिकेच्या या हल्ल्यानंतर इराणने पलटवार केला. इराणने कतारमधील दोहा येथील अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे डागले. यामुळे इराण-अमेरिका तणाव वाढण्याची शक्यता वाढली होती. मात्र, आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायल आणि इराणमध्ये शस्त्रबंदीबाबत निर्णय झाल्याचे म्हटले आहे. रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने म्हटले आहे की, इस्त्रायलनेही इराणसोबत युद्धबंदीसाठी सहमती दर्शवली आहे. इराणने आता तेल अवीववर हल्ला केला नाही तर इस्त्रायल इराणवर हल्ला करणार नाही. इराणकडूनही आता तेल अवीववर हल्ला करणार नाही, असे सांगण्यात आले आहे.

## घरकुलाचे हप्ते रखडले ; लाभार्थ्यांची हेळसांड घरकुल विभागातील रिक्त जागेवर अधिकाऱ्याची तत्काळ नेमणुक करा - ॲड.नारायण शिंदे

गेवराई (प्रतिनिधी) - पंचायत समिती गेवराई अंतर्गत घरकुल विभागातील विस्तार अधिकारी या पदाची जागा मागील काही महिन्यांपासून रिक्त असून यामुळे घरकुल विभागाचे नियमित कामकाज विस्कळीत झाले आहे. या रिक्ततेमुळे अनेक घरकुल लाभार्थ्यांचे अर्ज, कामे व मंजुरीची प्रक्रिया रखडली असून, या जागेवर तात्काळ अधिकाऱ्यांची नेमणूक करा अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख ॲड.नारायण शिंदे यांनी केली आहे.



याबाबत सविस्तर असे की, गेल्या अनेक दिवसांपासून सदर पद रिक्त असल्यामुळे विभागात भोंगळ कारभार सुरु असून, घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळवण्यासाठी वारंवार त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा कार्यालयात चकरा मारूनही निर्णय होत नाही, कागदपत्रे प्रलंबित राहतात आणि निधी मंजुरीची प्रक्रियाही ठप्प झाली आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाकडे त्यांनी लेखी निवेदन देऊन तत्काळ अधिकारी नेमणुकीची मागणी करण्यात आली आहे. संबंधित पदावर अधिकारी नेमणूक केल्यास घरकुल लाभार्थ्यांचे अडकलेले प्रश्न मार्गी लागतील आणि योजनांचा लाभ गरजूंना वेळेत मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. घरकुल योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि लाभार्थ्यांच्या सोयीसाठी यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ॲड.नारायण शिंदे यांच्यासह विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहराध्यक्ष मुकेश महाजन, उमेश शिंदे, बाळासाहेब खेडकर यांनी केली आहे.

## मा.श्री.अजित दादा आमदार संग्राम जगताप यांची पक्षातून हकलपट्टी करा :- शेख युनूस



बीड (प्रतिनिधी) महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज, मौलाना आझाद यांना मानणारा राज्य आहे. आणि या राज्यात जर आपल्याच पक्षातील अहमदनगर चे आमदार संग्राम जगताप जर मुसलमान विषयी अपशब्द वापरत असतील. तर मुस्लिम समाज कदापी खपवून घेणार नाही. राष्ट्रवादी पक्ष हा धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी विचारसरणी असणारा पक्ष आहे मग आपल्या पक्षात हा जातीवादी आणि सडक्या विचारांचा आमदार कसा? अशा आमदाराची आपल्या पक्षातून तत्काळ हकालपट्टी करावी आणि आमदारकीचा राजीनामा घ्यावा नाहीतर पुढील काळात मुस्लिम समाज तुमच्या पाठीशी राहणार नाही. आपल्या आमदाराने दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केलेले आहे. आपण त्याला पाठिशी घालू नये .

## चोरट्यांनी ७० शेळ्या लांबविल्या

अंबाजोगाई। प्रतिनिधी तालुक्यातील खापरटोन येथील शेतातील शेळ्याच्या शेडचे कुलूप तोडून अज्ञात चोरटयांनी शनिवार (दि.२१) रोजी रात्री शेळ्या,बोकड व पिल्ले असा एकूण ७० जनावरे अंदाजे किंमत ४,७२,००० रुपयांचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्हयात घरफोडी,दुचाकी चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत होती मात्र आता चोरट्यांनी शेळ्या चोरीकडे आपला मोर्चा वळवला आहे. अंबाजोगाई तालुक्यातील खापरटोन येथील बालाजी मुरलीधर फड (वय ४५) यांच्या शेतातील शेळ्याच्या शेडचे कुलूप व शेडची जाळी तोडून अज्ञात चोरटयांनी शनिवार (दि.२१)रोजी काळ्या,पांढऱ्या रंगाचे एकूण ४८ शेळ्या व बोकडअंदाजे किंमत ८००० रुपये प्रमाणे एकूण ३,८४,००० रुपये व २२ शेळ्यांची पिल्ले अंदाजे किमत ८८,००० रुपये असा एकूण ४,७२,००० रुपयांचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी बर्दापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## स्व शंकरराव ढोले पाटील व स्वर्गीय राणुजी ढोले पाटील यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त केले वृक्षारोपण

## - निसर्गाशी आपली नाळ जोडणारा संकल्प सातिराम आण्णा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड निसर्ग उपयोगी उपक्रम

प्रतिनिधी बीड बार्शी नाका परिसरातील सर्वपरिचित असणारे समाजसेवक अशोक दादा ढोले पाटील यांचे आजोबा स्वर्गीय शंकरराव ढोले पाटील व वडील स्वर्गीय राणुजी शंकरराव ढोले पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी प्रमाणे यावर्षी हि वृक्षारोपण व अन्नदान आदी विविध सामाजिक उपक्रम घेऊन विनम्र अभिवादन करण्यात आले आज बीड जिल्ह्यातील आहेरवडगाव येथे एम एस कन्स्ट्रक्शनचे संचालक सातिराम आण्णा ढोले पाटील,



अशोक दादा ढोले पाटील, प्रकाश तावरे, अशोक शिंदे बालाजी कुसळकर, मच्छिंद्र जोगदंड, परमेश्वर ढोले ,चैतन्य जाधव,

कृष्णा ढोले,आदी उपस्थित झाडे लावलें:व ते लावताना मनात एकच विचार होता - हा हिरवा सखा उद्याच्या पिढीसाठी श्वास घेईल.प्रदूषण, हवामान बदल, पाणीटंचाई यासारख्या समस्या वाढत असताना एक झाड लावणं म्हणजे पर्यावरणासाठी केलेलं एक छोटं पण शक्तिशाली पाऊल आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन हा संकल्प करुया - प्रत्येकाने एक झाड लावायचं आणि जगवायचं! तालुक्याच्या ठिकाणी वृक्षरोपण उपक्रम राबविले पाहिजेत जेणेकरून भविष्यात तापमान आटोक्यात राहील. म्हणून प्रत्त्यकाने किमान १- २ झाड लावून गाव हिरवागार केला पाहिजे. पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि त्याच संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्नशील असावे, असे आवाहन या माध्यमातून लोकशाही पत्रकार संघाचे शहर उपाध्यक्ष तथा सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड संस्थापक अध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील यांनी केले आहे

# आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी व्हावे

# बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

बीड दि.२२(प्रतिनिधी)- विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदानासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून द्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने दिनांक ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी व आपल्या हक्काचा टप्पा वाढीचा निधी पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे. राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला होता. दरम्यान निवडणुका होऊन पुन्हा शिवसेना भाजपाचे सरकार सत्तेत आले. या नवीन सरकारच्या विधिमंडळाची दोन अधिवेशन पार पडली, परंतु या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झाली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा




हिरमोड झाला. परंतु सरकारने आमचा, आमच्या वयाचा, आमच्या सेवेचा आमच्या घरांचा आणि घरातली व्यक्तींचा विचार करून आमच्या पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी विनाअनुदानित शिक्षकांसाठी कार्यरत असणारी मातृ संघटना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा १८ वा दिवस आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर, उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर , उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर, जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर,माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर , परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com